<u>रे.मु.नं. ८५५/२०१५ मधील नि.१५ वरील आदेश</u>

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांचेविरूध्द झालेले विना कैफियत आदेश रद्द करून कैफियत स्वीकारण्यासाठी दाखल केला आहे.

२ प्रतिवादीच्या मते, तो सातत्याने आजारी असल्यामूळे कोर्टात येवून वेळेत माहीती देवू शकला नाही. त्यामूळे कैफियत दाखल करण्यास उशीर झाला आहे. तो उशीर मुद्दाम केलेला नाही. त्यांचे पुढे असे कथन आहे कि, दावा मिळकती संदर्भात वादी व प्रतिवादी यांच्यात गंभीर तक्रारी आहेत. प्रतिवादींची कैफियत न स्विकारल्यास त्यांचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. याउलट वादीचे काहीही नुकसान होत नाही. सबब त्याच्याविरूध्द झालेले विना कैफियत आदेश रद्द करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

३ वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून त्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्याच्या मते अर्जातील मजकूर खोटा व बनावट असून तो वादीस मान्य नाही. खरा नाही व त्यातील कारण हे खरे नाही. प्रतिवादींनी कैफियत स्वीकारणेचा अर्ज एक वर्षानंतर केलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर व्हावा व मंजूर करावयाचा झाल्यास वादीला रक्कम रूपये २०००/— इतका खर्च मिळावा अशी विनंती केली आहे.

४ उभयपक्षाच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादीस दि. १७/६/२०१६ रोजी समन्स बजावणी झालेली दिसते. त्यांच्याकडुन कैफियत दाखल करण्यास जवळपास १० महीन्यांचा विलंब झालेला आहे. प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादींना त्यांची कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. त्यामुळे न्यायाचा हेतु साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.३ चा अर्ज रक्कम रू. ७००/— इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादी क्र.३ ने वादीस पुढील तारखेपर्यत अथवा न्यायालयाने वाढवून दिलेल्या वेळेपर्यत खर्च न दिल्यास प्रस्तूतचा अर्ज नामंजूर केला असे समजण्यात येईल.

दि.२०.०६.२०१७ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क स्तर,बार्शी

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd JtCJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 20/06/2017 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 20/06/2017 |
| Judgment/Order uploaded on | : : | 21/06/2017 |